# निशाणी क्रमांक ७६-अ वरील आदेश

(सुनिता वाळुंजकर विरुद्ध किसन दळवी व इतर)

प्रस्तूत अर्ज वादीच्या वतीने मयत प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशीर वारस पटलावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज व त्यावर प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १-ब यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १-अ व १-क यांच्याविरुद्ध प्रस्तुत अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

**३.** वादीच्या वतीने विद्वान विधीज्ञ श्री. एच. टी. काशिद व प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १-ब यांच्या वतीने विद्वान विधीज्ञ श्री. एच. एन. डोके यांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** वादीचे असे कथन आहे की, मुळ प्रतिवादी क्र. १ किसन माणिकराव दळवी हे मयत झालेले असून त्यांना प्रस्तुत अर्जामधील नमुद प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १-अ ते १-क हे एकमेव कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, प्रस्तुत दावा पुढे चालविण्यासाठी त्यांना मयत प्रतिवादी क्र. १ चे कायदेशीर वारस या नात्याने दाव्याच्या प्रतिवादीपणात समाविष्ट करुन प्रस्तुत दावा पुढे चालविण्यास परवानगी मिळावी. प्रस्तावीत प्रतिवादी क्र. १-ब याने प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यास हरकत घेतलेली आहे.

**५.** अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ किसन माणिकराव दळवी हे दि. २८.०४.२०१९ रोजी मयत झालेले आहेत. दाव्याचे स्वरुप विचारात घेता प्रस्तावित प्रतिवादी क्र. १-अ ते १-क यांना मयत प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशीर वारस या नात्याने दावा मिळकतीमध्ये निश्चीतपणे हक्क व हितसंबंध दडलेले असल्याने त्यांना दाव्याच्या प्रतिवादीपणामध्ये समाविष्ट करणे न्यायोचीत होईल. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

०१. अर्ज नि. क्र. ७६-अ मंजुर करण्यात येतो.

०२. वादीस निर्देशीत करण्यात येते की, मयत प्रतिवादी क्र. १ यांचे कायदेशीर वारस म्हणून प्रस्तावित प्रतिवादी क्र. १-अ ते १-क यांना दाव्याच्या प्रतिवादीपणात समाविष्ट करावे व त्यानुसार प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करुन घेण्यात यावी.

सही/-
(रजनिकांत शे.जगताप)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.

दिनांकः २३/०१/२०२४.